**प्रेस नोट दिनांक ०९/०४/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**उबेर कंपनीचे गाडीमध्ये विसरून राहीलेली बॅग व त्यामधील रोख रक्कम २५००/- रूपये याचा शोध घेवून तक्रारदारास परत.**

दि. ०१.०४.२०१९ रोजी फडगेट पोलीस चौकीचे दिवसपाळी डयुटी अंमलदार पोहवा ५५६९ क्षीरसागर हे पोलीस चौकीस हजर असताना इसमनामे मुदीत सत्यप्रकाश सक्सेना,वय २६ वर्षे,रा.टिळकनगर रघुवीरनगर,दिल्ली यांनी समक्ष येवून कळविले की, ते उबेर गाडीतुन प्रवास करीत असताना शिंदे आळी शुक्रवार पेठ,पुणे याठिकाणी गाडीतुन खाली उतरले त्यावेळी त्यांची सॅकबॅग गाडीत विसरली असून त्यामध्ये महत्वाची कागदपत्रे व रोख रक्कम २,५०० रूपये असल्याचे सांगितले. सदर व्यक्तीस गाडीचे नंबरबाबत विचारपुस करता त्यांनी नंबर माहित नसल्याचे सांगितले. पो.हवा.क्षीरसागर यांनी सपोनि.मुजावर, पो.ना.मानकर यांचे मदतीने उबेर कंपनीशी संपर्क साधुन तक्रारदार ज्या गाडीतुन बसले होते. त्या गाडी चालकाचा मोबाईल नंबर प्राप्त केला. सदर गाडी चालकाशी संपर्क साधुन त्यास फडगेट पोलीस चौकीस बोलविण्यात आले. गाडी चालकाकडे तक्रारदार याचे सॅकबॅग बाबत चौकशी करता गाडी चालकाने सदरची बॅग गाडीत असल्याचे सांगुन ती पोलीसांचे ताब्यात दिली. सदर सॅगबॅग त्यामधील कागदपत्रे व रोख रक्कम २,५००/- असा ऐवज तक्रारदार मुदित सक्सेना यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे.

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

